# ऐतिहासिक घटना घटनाक्रम

| साल | घटना |
|---|---|
| १९०५ | बंगालची फाळणी लॉर्ड कर्झने केली |
| १९०६ | मुस्लीम लीगची स्थापना |
| १९०८ | वर्तमान पत्राचा कायदा |
| १९०९ | मोर्लोमिंटो सुधारणा |
| १९११ | पाचव्या जॉर्जची भारत-भेट, राजधानी कलकत्त्याहुन दिल्लीला-दिल्ली दरबार, बंगालची फाळणी रदद् |
| १९१४ | पहिले जागतिक महायुध्द |
| १९१७ | रशियन क्रांती |
| १९१८ | पहिल्या महायुध्दाची समाप्ती |
| १९१९ | मॉटेग्यू चेम्सफर्ड कायदा, रौलट ॲक्ट, जालीयनवाला बाग हत्याकांड |
| १९२० | लोकमान्य टिळकांचे निधन, असहकार चळवळ सुरु करण्याचा निर्धार |
| १९२१ | प्रिंस ऑफ वेल्सची भारत - भेट, देशभर निदर्शन, हरताळ, भारताची जनगणना |
| १९२२ | सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु, बार्डोलीचे सत्याग्रह, चौरीचोरा येथे हिंसक घटना- त्या घटनेचे प्रायश्चित म्हणुन गांधीजीनी आंदोलन स्थगित केले |
| १९२५ | राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना |
| १९२८ | सायमन कमिशनची भेट व कमिशनवर बहिष्कार |
| १९२९ | लाहोर येथील कॉंग्रेस अधिवेशनात संपुर्ण स्वराज्याचा ठराव मंजुर- पंडित जवाहरलाल अध्यक्ष |
| १९३० | महात्मा गांधीजींची दांडी यात्रा व सत्याग्रह |
| १९३१ | गांधी आयर्विन करार |
| १९३२ | तिसरी गोलमेज परिषद, पुणे करार |
| १९३५ | गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट. |
| १९३७ | प्रांतिक स्वायत्तता, ७ प्रांतात कॉंग्रेस मंत्रीमंडळे |
| १९३९ | दुसरे जागतिक महायुध्द |
| १९४२ | चले जाव चळवळ- ८ ऑगस्ट, क्रिप्स योजना फेटाळली |
| १९४३ | सिंगापुरला आझाद हिंद फौजेची स्थापना |

| | |
|---|---|
| १९४५ | हिरोशिमा- नागासाकीवर बॉब हल्ले, दुसरे महायुध्द समाप्त, संयुक्त राष्ट्रसंघाची स्थपना, आझाद हिंद फौजेवर खटला, सिमला परिषद अयशस्वी. |
| १९४६ | घटना समितीची पहीली बैठक |
| १९४७ | भारताची फाळणी - भारत पाकिस्तान स्वतंत्र (भारत १५ ऑगस्ट १९४७ स्वतंत्र) |
| १९४८ | म. गांधीचा वध (३० जानेवारी १९४८), संस्थानांचे विलिनीकरण. |
| १९५० | भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना - २६ जानेवारी १९५०. |
| १९५१ | पहिली पंचवार्षिक योजना सुरु |
| १९५२ | स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका |
| १९५३ | आंध्र राज्याची स्थापना |
| १९५६ | भाषावर राज्यपुर्नरचना कायदामंजुर, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात, तुर्भे येथे अणुभटटी सुरु |
| १९५७ | दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका, वजनमापांची दशमान पध्दती सुरु |
| १९५८ | पाकिस्तानमध्ये लष्करी राजवट सुरु- फिल्डमार्शल आयुंबाखान- सर्वसत्ताशिस. |
| १९५९ | दलाई लामांचे तिबेटमधुन पलायन, भारतात आश्रय |
| १९६० | मुबंई राज्याचे विभाजन- गुजरात आणि महाराष्ट्र राज्याची निर्मीती '१ मे १९६० - महाराष्ट्र राज्य स्थापना |
| १९६१ | गोवा पोर्तुगिजांकडुन मुक्त, तिसरी पंचवार्षिक योजना सुरु, बेलग्रड येथे नि:शस्त्रीकरण परिषद 'एन ए एम', रशियाचे अंतराळात मानवासहित यान. |
| १९६२ | चीनचे भारतावर आक्रमण, तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुका |
| १९६३ | अण्वसत्रबंदी करारावर तीन बडया राष्ट्रांच्या सहया, भाक्रानांगल धरण राष्ट्रास समर्पण, जॉन केनेडी यांचा वध, मलेशियाची निर्मिती, केनया-झांजिबार स्वतंत्र |
| १९६४ | पं. जवाहरलाल नेहरु यांचे निधन, लालबहादुर शास्त्री पंतप्रधान |
| १९६५ | ६ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर- भारत-पाक युध्द, सुरुवातीस पाकचे भारतावर आक्रमण, भारताकडुन सपाटून मार खाल्ल्यावर युध्द बंदी |
| १९६६ | ताश्कंद करार, लालबहादुर शास्त्री यांचे निधन, श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान, पंजाब राज्याचे विभाजन, पंजाब-हरयाणा दोन स्वतंत्र राज्ये |
| १९६७ | डॉ. झाकिर हुसेन भारताचे राष्ट्रपती, चौथ्या सार्वत्रिक निवडणुका, अरब-इस्त्राइल युध्द |
| १९६९ | झाकिर हुसेन यांचे निधन- श्री. वराहगिरी वैंकटगिरी भारताचे राष्टपती, कॉंग्रेस पक्षात दुफळी, १४ बॅंकांचे राष्ट्रीयकरण, चंद्रावर मानवाचे पहिले पाउल |

| | |
|---|---|
| १९७० | कर्नल नासर यांचा मृत्यु. चौथी लोकसभा विसर्जित |
| १९७१ | पाकचे भारतावर आक्रमण, ३ डिसेंबर ते १७ डिसेंबर भारत - पाक युध्द, बंागला देशची स्थापना, ८९ हजार पाकिस्तांनी सैनिकांचे शरणागणी, संस्थानिकांचे तनखे रदद्, चीनाचा युनोत प्रवेश, हिमालय प्रदेश राज्य, कन्हैयालाल मुनशींचे निधन, जनरल इन्शुरन्सचे राष्ट्रीयकरण. |
| १९७२ | शेख मुजीबूर रेहमान यांची सुटका, सिमला करार, मेघालय, मणीपुर, त्रिपूरा नवीन राज्ये, मिझोराम, अरुणाचल नवीन केंद्रशासित प्रदेश, चक्रवर्ती राजगोपालाचारींचे निधन |
| १९७३ | म्हैसूर राज्याचे कर्नाटक राज्य असे नामकरण करण्यात आले. लक्षव्दीप केंद्रशासित प्रदेश घोषित, जनरल माणेकशा भारताचे पहिले फील्ड मार्शल, चौथे अरब-इस्त्राएल युध्द, केंदि्रय मंत्री मोहन कुमार मंगलम यांचा विमान अपघातात मृत्यू. |
| १९७४ | राजस्थानात पोखरण वाळवंटात भारताचा भुमिगत परमाणू परमाणू स्फोट यशस्वी '१८ मे', फकरुददीन-अली अहमद भारताचे राष्ट्रपती, बी.डी.जत्ती उपराष्ट्रपती, सुचेता कृपालानी यांचा मृत्यू. |
| १९७५ | बॉबे हाय जवळ खनिज तेलांचा शोध 'जाने. ११', सिक्कीम २२ वे घटक राज्य म्हणुन जाहीर, 'आर्यभटट' हा उपग्रह अवकाशात सोडुन भारताचा अंतरिक्षयुगात प्रवेश, इंदिरा गांधीची लोकसभेवरील निवडणुक रदद, अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णय '१२जुन', देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर '२६ जुन', डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे निधन '१७ एप्रिल', कामराज यांचे निधन '२ ऑक्टो.', महिला वर्ष, २० कलमी कार्यक्रमाची घोषणा, बंगला देशात बंड, मुजीबूर रहमान यांची हत्या. |
| १९७६ | ४२ वी घटना दुरूस्ती. |
| १९७७ | लोकसभा विसर्जित, लोकसभा निवडणुकात जनता पक्ष सत्तेवर, मोरारजी देसाई नवे पंतप्रधान. |
| १९७९ | दुसरा भारतीय उपग्रह 'भास्कर' अवकाशात, जनता सरकारमध्ये फूट, चरणसिंग नवे पंतप्रधान. |
| १९८२ | चरणसिंग सरकार अल्पमतात, लोकसभा निवडणुकीत पुन्हा काँग्रेस सत्तेवर, इंदिरा गांधी पंतप्रधान. |
| १९८३ | भारत व बांगला देशात गंगा व तीस्ता नद्यांच्या पाणीवाटपासंबंधी करार, पर्यावरणाद्यांच्या दबावामुळे 'सायलेंट व्हॅली प्रकल्प' बंद, नवी दिल्लीत राष्ट्रकुल प्रमुखांची बैठक. |
| १८८४ | स्क्वा. लीडर राकेश शर्मा अंतराळात जाणारा पहिला भारतीय, बचेंद्री पाल एवरेस्ट पादाक्रांत करणारी पहिली भारतीय महिला, वेंकटरामन भारताचे नवे राष्ट.पती, श्रीमती इंदिरा गांधीची त्यांच्याच सुरक्षा सैनिकांकडून हत्या, उत्तरेत हिंसाचारातहजारो मृत्यूमुखी, लाखो जायबंदी, लोकसभा निवडणूका, कॉग्रेसला अभूतपर्व यश. |

| | |
|---|---|
| १९८५ | काँग्रेस शताब्दी देशभर साजरी, मुंबईत खास कार्यक्रम. |
| १९८६ | मुस्लीम महिला विधेयक लोकसभेत संमत, तेनसिंग नोर्के यांचे निधन, मिझो करारावर सह्या- लालडेंगा मुख्यमंत्रीपदी, पोप जॉन पॉल दुसरे दहा दिवसांच्या भारत भेटीस, बंगलोर येथे सार्क शिखर परिषद सुरू 'अपना उत्सव' दिल्लीत सुरू. |
| १९८७ | मिझोरम, अरूणाचलप्रदेश व गोव्यात राज्याचा दर्जा, राष्ट्रपती म्हणून वेंकटरामन यांची निवड, डॉ. शंकरदयाळ शर्मा उपराष्ट्रपती, एम.जी. रामचंद्रन कालवश. |
| १९८८ | अर्थतज्ज्ञम्प्;म्प्;ा लक्ष्मीकांत यांचे पुण्यात निधन, पृथ्वी अग्निबाणाची यशस्वी चाचणी, 'ऑपरेशन ब्लॅक थंडर' सुवर्ण मंदिरातून अतिरेक्यांना हुलकण्यास यश, सात राजकीय पक्षांची राष्ट्रीय आघाडी अस्तित्वात, गोरखालँड आंदोलन समाप्त, मालदीवमधील बंडाळी रोखण्यास भारतीय सैन्य. |
| १९८९ | कै. इंदिराजींचे मारेकरी सतवंतसिंग व बिआंतसिंग यांना दिल्लीत फाशी, तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत डी. एम. के.ला पूर्ण बहुमत, ओरिसातून 'अग्नी' क्षेपणास्त्राचे यशस्वी उड्डाण. जमिनीवर मारा करण्याऱ्या 'त्रिशूल' या क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी, श्रीलंकेतून शांतीसेनेच्या माघारीस भारताच्ी तत्वत: मान्यता, नवव्या लोकसभेसाठी नोव्हेंबरात मतदान, जन. वैद्यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा जाहीर, अयोध्येत वादग्रस्त श्रीराम मंदिराचा शिलान्यास, लोकसभा निवडणुका हिंसाचारात पार, कुणालाच बहुमत नाही, पंतप्रधान राजीव गांधीच राजीनामा, जनता दलाचे विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधानपदी आरूढ, भाजप व मार्क्सवादी कम्युनिस्टांचा बाहेरून पाठिंबा, काश्मीर खोऱ्यात हिंसाचाराचा उद्रेक. |
| १९९० | जम्मु-काश्मीरचे मुख्यमंत्री डॉ. फारूख अब्दुल्ला यांचा राजीनामा, विधानसभा बरखास्त, ७ राज्ये व १ केंद्रशासित प्रदेशात विधानसभांसाठी मतदान, अनेक राज्यात काँग्रेसेत्तर सरकारे अधिकारावर, भारतीय शांतीसेनेची शेवटची तुकडी श्रीलंकेतून भारतात परत, उपपंतप्रधान देवीलाल केंदि्रय मंत्रिमंडळातून बडर्तफ, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गासाठी सरकारी नोकऱ्यांत २७ टक्के जागा राखीव ठेवण्यात सरकारचा निर्णय, देशभर राखीव जागाविरोधी आंडोलन, हिंसाचार, जाळपोळ, आत्मदहनाचे थैमान, प्रसारभारती विधेयक लोकसभेत संमत, भाजपची रथयात्रा सुरू, जनता दलात फूट, बंडखोर गटाच्या नेतेपदी चंद्रशेखर, विश्वनाथ प्रतापसिंग सरकार कोसळले, कॉग्रेसच्या पाठिंब्याने केंद्रात चंद्रशेखर यांचे सरकार. |
| १९९१ | पंतप्रधान चंद्रशेखर यांचा राजीनामा, अनेक विधानसभांचे विसर्जन, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची मद्रासजवळ श्रीपेरांबुदूर येथे बॉम्बस्फोटात हत्या. ज्येष्ठ साम्यवादी नेते भाई डांगेचे निधन. लोकसभा निवडणुकात कॉग्रेसला सर्वाधिक जागा, भजप दुसऱ्या स्थानावर, पंतप्रधानपदी पी. व्ही. नरसिंहाचीह राव, नव्या उदार आर्थिक धोरणाचा श्रीगणेशा, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांना विशेष ऑस्कर पुरस्कार जाहीर. |

| | |
|---|---|
| १९९२ | भारताचे इस्त्राइलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित, पंजाबमध्ये निवडणुका काँग्रेस (आय)चे सरकार, शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा उघडीस, भारताच्या राष्ट्रपतीपदी डॉ. शंकर दयाळ शर्मा तर उप-राष्ट्रपतीपदी डॉ. के. आर. नारायणन, जनता दलात फूट- अजितसिंग गट वेगळा, मंडल आयोगाच्या शिफारसीवर सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब, अयोध्येतील बाबरी मशीद कारसेवकांकडून जमीनदोस्त, उत्तरप्रदेश व भाजपची अन्य राज्यसरकार बडर्तफ. |
| १९९३ | महाराष्ट्र्राच्या मुख्यमंत्रीपदी शरद पवारांची नियुक्ती, मुंबईत एकाच दिवशी बारा ठिकाणी बॉम्बस्फोट २५० ठार, पंतप्रधान श्री. नरसिंहाचीह रावांना १ कोटी रूपये दिल्याचा हर्षद मेहतांचा आरोप, मराठवाडयात भयानक भूंकप १० हजार ठार. दिल्ली व राजस्तानाता भाजप, हिमाचल व मध्य प्रदेश काँग्रेस तर उत्तरप्रदेशात समाजवादी जनता पक्ष व बहुजन समाज युती सत्तेवर. |
| १९९४ | जनता दलात फूट, जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली नवीन गट, पंजाब व हिमालयचे राज्यपाल सुरेंद्रनाथ व त्यांचे कुटुंबीय विमान अपघातात ठार, सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण वाढवता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, नागपुरात आदिवासी मोर्चावरील पोलिस लाठीमार चेंगराचेंगरीत १२५ ठार. |
| १९९५ | एन. डी. तिवारी यांचा कॉंग्रेसचा राजीनामा, माजी पंतप्रधान मोरारजीभाई देसाईंचे निधन, काश्मिरातील चरार-ए-शरीफ दर्गा अतिरेक्यांकडून भस्मसात, टाडा कायदा रद्द, पंजाबचे मुख्यमंत्री बेआंतसिंग यांची बॉम्बस्फोटात ग्त्या, हवाई हद्दीचा भंग करून भारतात घुसून परकी विमानाने प. बंगालमध्ये शस्त्रसाठयाची फेक. |
| १९९६ | ११ वी लोकसभा अस्तितत्वात, भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्त्वाखालील भाजप-शिवसेनेचे सरकार सत्तारूढ. अल्पमतातील वाजपेयी सरकारचा अवघ्या १३ दिवसा‍ा राजीनामा, देवेगौडा यांच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त आघाडीचे सरकार, अमरनाथ यात्रेत प्रतिकूल हवामानामुळे २०० यात्रेकरूमृत्युमुखी, नरसिंहाचीहराव यांच्या काँग्रेस पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा, सीताराम केसरी कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष, जम्मू व काश्मीरात नॅशनल कॉन्फरन्सला बहुमत, उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत कोणालाच बहुमत नाही. सेंट किट्स प्रकरणी माजी पंतप्रधान नरसिंहाचीहराव यांना अटक व सुटका. |
| १९९७ | देवेगौडा सरकार कोसळले. नवे पंपप्रधान इंद्रकुमार गुजराल, कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी सीताराम केसरी यांची प्रचंड मतधिक्याने निवड, भारताच्या राष्ट्रपतीपदी डॉ. के. आर्. नारायनन्, जनता दलात फुट- लालूप्रसाद यदव यांचा नवा पक्ष स्थापन; बिहारच्या मुख्यमंत्री पदी श्रीमती रबडी देवी, नवे उपराष्ट्रपती कृष्णकांत, मदर तेरेसा यांचे निधन, उत्तर प्रदेशातील भाजपचे कल्याणसिंग सरकार धोक्यात, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधीमंडळात बहुमतासाठी |

| | |
|---|---|
| | मतदान, कल्याणसिंग पुन्हा मुख्यमंत्रीपदी. |
| १९९८ | श्रीमती सोनिया गांधी सक्रिय राजकारणात; कै. राजीव गांध िहत्या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा जाहीर; राजीव गांधी हत्येशी संबधित जैन अहवाल केंद्र सरकारला सादर; कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी श्रीमती सोनिया गांधी यांची नेमणूक; लोकसभा निवडणुकीत कुणालाच बहुमत नाही, भाजप व मित्र पक्षांना सर्वाधिक जागा; देशाच्या पंतप्रधानपदी अटलबिहारी वाजपेयी, तर लोकसभेच्या सभापतीपदी तेलगू देसमचे गंटी मोहनचंद्र बालयोगी; पोखरण येथे भारतकडून यशस्वी अणुस्फोट; अमेरिकेचे आर्थिक निर्बंध लागू: दिल्ली राजस्थान व मध्यप्रदेशातील निाडणुकांत भाजपची पिछेहाट, सर्वत्र कॉँग्रेस विजयी. |
| १९९९ | शिरोमणी गुरूव्दारा प्रबंधक कमिटीच्या अध्यक्षपदी महिलेची (जागीर कौर) प्रथमच नेमणूक, पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजन (पी.आय.ओ.) कराड परदेशस्थ भारतीयांसाठी देण्यात येणार, नवीन एक्झीम पॉलिसीनुसार ८९४ वस्तू आयात निर्बंधारतून मुक्त , इन्सॅट-२ ई चे यशस्वी प्रक्षेपण, अग्नि-२ क्षेपणास्त्राची चाचणी, पंतप्रधान वाजपेयी सरकारचा लोकसभेमध्ये १ मताने पराभव, सरकारचा राजीनामा, गोवा विधानसभा निवडणुकीमध्ये सर्व मतदार संघात इलेक्ट्रॉनिक मशीनव्दारा मतदान, कारगिल लढाईची सुरूवात, भारतीय अग्निबाणातून परदेशांचे उपग्रह यशस्वीरित्या अंतराळात प्रक्षेपित, आय.एन.एस. म्हैसूर या भारतीय बनावटीच्या डिस्टॉयर क्लास जहाजाचे जलावरण, भारतीय फौजांनी टायगर हिल्सवर पुन्हा कब्जा मिळविला, भारतीय बनावटीच्या नाग या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी, भारतीय बनावटीच्या निशांत या वैमानिक विरहित विमानाची चाचणी, तेराव्या लोकसभेच्या निवडणुका, तेराव्या लोकसभेत भजप सर्वात मोठा पक्ष, एन.डी.ए.ला ३०३ जागा, लोकसभा उपसभापती पी.एम.सईद यांच्या लक्षव्दीप मतदार संघातून सतत दहा वेळा निवडून येण्याचा विक्रम. अटलबिहारी वाजपेयी तिसऱ्यांदा पंतप्रधान, पोप जॉन पॉल दुसरे यांची भारतास भेट, इंडियन एअर लाईन्सच्या काठमांडू दिल्ली विमानाचे अपहरण, तीन अतिरेक्यांच्या मोबदल्यात प्रवाशांची सुटका. |
| २००० | १४ वर्षीय कर्मापा लामा यांचे तिबेटमधून धर्मशाला येथे आगमन. उत्तरप्रदेश इलेक्िटसिटी बोर्डाचे विभाजन ३ नवीन कंपन्या स्थापन, ७९व्या घटना दुरूस्तीला १० वर्षे मुदतवाढ, न्या. वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली घटना फेर आढावा समिती स्थापन, अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांची भारतास भेट, एलपीजीचा वापर मोटारीमध्ये इंधन म्हणून भरू देण्यास केंद्र शासनाची मान्यता, लारा दत्ता हिची मिस युनिव्हर्स २००० म्हणून निवड, ओरिसामधील १० वाघांचा मृत्यू, सिंधुशस्त्र ही आत्याधुनिक पाणबुडी नौदलात दाखल, किब्बर सिमला येथे जगातील सर्वात उंचीवरचे (समुद्र सपाटीपासून उंची १४,५००फूट) टेलिफोन एक्स्चेंज कार्यान्वित, कुख्यात चंदन तस्कर वीरप्पनने कन्नड अभिनेता राजकुमार व अन्य ४ जणांचे |

| | |
|---|---|
| | अपहरण, उत्तरांचल, झारखंड, छत्तिसगड, यांच्या निर्मितीचे विधेयक मंजूर, सिएरा लिओन मधील भारतीय सैनिक काढून घेण्याचा निर्णय, विशेष न्यायालयाने माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहाचीहराव आणि बुटासिंग यांना झारखंड मुक्‍ितमोर्चा खासदारांकडून घेतलेल्या लाच प्रकरणात दोषी ठरविले, निवडणूक आयोगाने सी पी आय (एम) पक्षाची मान्यता रद्द केली. रू. १०००/-ची नोट चलनात दाखल, पंतप्रधान वाजपेयी यांच्या गुडघ्यावर मुंबईमध्ये शस्त्रक्रिया. |
| २००१ | सरकारने २००१ हे " महिला सबलीकरण वर्ष" म्हणून घोषित केले. म्हणून घोषित केले. गुजराथमध्ये ७.४ रिश्टर स्केलचा विध्वसंक भूकंप सुमारे २०,००० मृत्यू; जगातील सर्वांत व्यापक अशी भारतीय जनगणना संपन्न; प्रतिष्ठित असा आंतरराष्ट्रीय आरमार निरीक्षण सोहळा मुंबई बंदरात संपन्न; भारतीय बँडमिंटनपटू पी. गोपीचंद याने आखिल इंग्लड बँडमिंटन स्पर्धा जिंकली; तहलाका डॉटकॉम या वेबसाईटने सरंक्षण खात्यातील भाषांतरांवरूनरष्टचार उघडकीस आणणारी चित्रफीत सादर करून प्रचंड खळबळ उडवली संरक्षणमंत्री फर्नांडिस आणि भाजप अध्यक्ष बंगारू लक्ष्मण यांचा राजीनामा; जी. एम. एल. व्ही. चे यशस्वी उड्डाण; ऑपरेशन विजय ही भारतीय सैन्यदलाची सर्वात मोठी लष्करी कवायत संपन्न; वैमानिक रहित टेहाळणी, विमानांचा त्यामध्ये प्रथमच समावेश; पाकिस्तानचे लष्करी प्रशासक आणि अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच भारत दौरा आग्रा येथे व्दिपक्षीय बैठक अयशस्वी; ई-पोस्ट सेवेला सुरूवात; युनिट ट्रस्ट ऑफ इंडियामधील घोटाळयाची चौकशी करण्यासाठी जॉइंट पार्लमेंटरी कमिटी नियुक्त; अग्नी क्षेपणास्त्र लष्कराच्या सेवेत दाखल; लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या जागांची संख्या २०२६ पर्यंत वाढविण्यात येणार नाही; लोकसभेच्या सभापतीसमोरील जागेत धाव घेणाऱ्या सदस्यांचे सभासदत्व ५ दिवसांसाठी आपोआप रद्द करण्याचा नियम सभापती बालयोगी यांनी केला; रेल्वेमंत्र्यांनी भाडयावर सुरक्षा सरचार्ज आकारण्याचे जाहीर केले. भारतीय संसदेवर पाकिस्तानी अतिरेक्यांच्या हल्ला. इन्सॅट ३सी अवकाशात, अग्नी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी, |
| २००२ | दिल्ली लाहोर बससेवा व समझोता एक्सप्रेस ही रेल्वेसेवा बंद, स्टेट बँक ऑफ इंडियाचे स्वत:चे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग नेटर्वक कार्यान्वित, भारतभरातील २५ ठिकाणांचे अधिकारी एकाच वेळी मीटिंग कॉन्फरन्स घेऊ शक्तील. कैंद्रिय कर्मचाऱ्यंसाठी स्वेच्छ निवृत्ती योजना. विदेश संचार निगम लि. ची टाटा समूहाला विक्री, गुजराथेतील गोध्रा येथे अयोध्देतून परतणाऱ्या विश्वहिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर रेल्वे डब्याला आग लावली. या घटनेची प्रतिक्रिया म्हणून गुजरातमध्ये दंगली उसळल्या. लोकसभा अध्यक्ष जी एम सी बालयोगी यांचा अपघाती मृत्यू, भारत चीन दरम्यान थेट विमानसेवासुरू, खाजगी रेडिओ सेवा सुरू, गोवा विधानससभा बरखास्त, निवडणुकीत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर विजयी, पुन: त्या पदावर |

| | |
|---|---|
| | आरूढ, सहकारी बँकामधील सरकारी रोखे गुंतवणूक घोटाळा उघड, बनावट मुद्रांक साहित्य-विक्री घोटळा उघड, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची भारताचे राष्ट्रपती म्हणून निवड, उद्योगपती धिरूभाई अंबानी यांचे निधन, गुटखा उटपादन, विक्री, आयात व पादर्शन यावर बंदी, नटराज हा भारतीय बनावटीचा रोबो तयार, भैरॉसिंह १२वे उपराष्ट्रपती, गांधीनगर येथील अक्षरधाम मंदिरावर अतिरेक्यांचा हल्ला ४४ मृत्यू. सुखोई-३० अत्याधुनिक विमाने हवाईदलात दाखल. रेल्वेचे दोन नवीन विभाग अस्तित्वात -ईस्ट सेंन्ट्रल झोन व नॉर्थ वेस्टर्न झोन. जम्मू काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका संपन्न, काँग्रेस व पीपल्यय डेमोक्रेटिक पार्टीचे संयुक्त सरकार अधिकारावर, मुफ्ती महंमद सैद मुख्यमंत्री, भारत संचार निगम लि. ची मोबाईल फोन सेवा सुरू. चंदनतस्कर वीरप्पनने माजी मंत्री नागप्पा याम्चे अपहरण केले, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुपीटी) सुरू. गुजरातमध्ये निवडणूक नरेंद्र मोंदी पुन्हा मुख्यमंत्री, नवी दिल्ली मध्ये भुयारी रेल्वे (मेट्रो) सुरू. |
| २००३ | गोव्यात स्काय बस प्रकल्पाला मान्यता, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी सुशीलकुमार शिंदे, संपूर्ण देशी बनावटीचे १४ आसनी सारस या प्रोटोटाईप विमानाचे अनावरण, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे तैलचित्र संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये लावण्यात आले, हिमालय प्रदेश, त्रिपुरा, नागालँड व मेघालय या राज्यांमध्ये निवडणुका, हवेतल्या हवेत इंधन भरणरे लढाऊ विमान हवाई दलात दाखल, मुंबईत लोकलमध्ये बॉम्बेस्फोट, संत एकनाथ महाराजांचे टपाल तिकीट प्रकाशित, मुद्रांक घोटाळयातील ३८ आरोपींविरूध्द आरोपपत्र दाखल, शिवालिक या युध्दनौकेचे जलावतरण, इन्सॅट-३ ए चे यशस्वी प्रक्षेपण, लक्ष्य या वैमानिक रहित विमानाची चाचणी यशस्वी, संसदेच्या आवारात शिवजी महाराजांच्या आश्र्वारूढ पुतळा, जीएसएलव्ही डी-२चे भारतातून यशस्वी उड्डाण, मुंबई अमृतसर फ्रॉटियर मेलच्या ३ डब्यांना आग, संत मुक्ताबाईचे टपालतिकीट प्रकाशित, दिल्ली-लाहोर बससेवा पुन्हा सुरू, मुंबईत पुन्हा एकदा बेस्ट बसमध्ये बॉम्बस्फोट, ओएनजीसीच्या कर्मचाऱ्यांना बॉम्बस्फोट घेऊन जाणारे हेलिकॉप्टर समुद्रात कोसळून २७ मृत्यू, मुंबईत एकाचवेळी २ ठिकाणी बॉम्बस्फोट, गेट वे ऑफ इंडिया व मुंबाईदेवी मंदिर येथील स्फोटात ४६ मृत्यू, उत्तर प्रदेशचे नवे मुख्यमंत्री म्हणून मुलायमसिंग यादव यांचा शपथविधी, नाशिक येथील कुंभमेळयात गर्दीत चेंगराचेंगरीत ३३ यात्रेकरू मृत्युमुखी, नक्षलवाद्यांच्या बॉम्बस्फोटात आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू गभीर जखमी. मध्यप्रदेश राजस्थान, छत्तीसगड, नवी दिल्ली हया चार राज्यांमधील निवडणुकांमध्ये दिल्ली वगळता भाजप सत्तेवर. मुद्रांक घोटाळयात मुंबई पोलीस कमिशनर यांच्यासह अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी, धुळयाचे आमदार अनिल गोटे, आंध्रप्रदेशचे राज्यमंत्री अटकेत व तुरूंगात. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा राजीनामा. रेल्वेमधील चतुर्थ श्रेणी नोकरभरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यावरून महाराष्ट्र, आसाम इ. राज्यांमध्ये |

| | |
|---|---|
| | बिहारींविरूध्द आंदोलन. आय.आय.एम. या प्रतिष्ठित मॅनेजमेंट इन्स्टिटयुटच्या प्रवेश परिक्षेचे पेपर फुटल्याप्रकरणात पुणे व नवी दिल्ली येथे अटक सत्र. |